| | |
|---|---|
| MHPU120009972023 | नियमित दिवाणी दावा क्र.१४९/२०२३ मधील निशाणी क्रमांक ८८ वरील आदेश (शिला प्रताप कोंडे देशमुख व इतर विरुध्द सिंधुबाई प्रतापराव जगताप व इतर ) |

वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ सिंधुबाई प्रतापराव जगताप या दि.०४.०७.२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांच्या मृत्युपुश्चात त्यांना अर्जात नमूद प्रतिवादी क्र.१ अ ते प्रतिवादी क्र.१ एच इत्यादी कायदेशीर प्रतिनिधी आहेत. सबब, अर्जात नमूद त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना प्रस्तुतकामी सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे. सबब, त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ अ ते प्रतिवादी क्र.१ एफ व १ एच यांनी त्यांचे म्हणणे नि.१०० दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर प्रतिनिधींना विहीत मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे त्यांच्याविरुध्द दावा अबेट झालेला आहे. त्याचप्रमाणे अबेटमेंट रद्द होवून मिळण्याकरीता वादी यांनी दाखल केलेल्या अर्जाची तसेच विलंबाच्या अर्जाची नोटीस प्रस्तुत प्रतिवादींना मिळालेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा कायद्याप्रमाणे पात्र नाही. तसेच वादी यांनी एकतर्फी हुकूम मिळवून तो जास्तीत जास्त कालावधीकरीता कायम राहावा या हेतूने जाणीवपूर्वक प्रस्तुत अर्ज दाखल करण्याकरीता विलंब केलेला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्रमांक १ च्या कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणेकरीता दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ अन्वये प्रतिवादीचा मृत्यू झाल्यास आणि दावा चालविणेचा अधिकार टिकून राहील्यास तर त्याबाबतीत, तसा अर्ज करण्यात आल्यास न्यायालयाने मृत प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करुन घेण्याबाबत तरतूद आहे. सबब, उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे आवश्यक आहे.

५. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे आज्ञार्थी व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे विचारात घेता हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने यापूर्वीच नि.६५ व ६७ वर विलंब माफीकरीता व अबेटमेंट रद्द करण्याकरीता अर्ज दाखल केलेले आहेत. सदर अर्जांवर माझ्या पूर्वाधिकाऱ्यांनी प्रतिवादींचे म्हणणे दाखल करण्याचे आदेश दिलेले होते. सबब, त्याबाबतची नोटीस प्रस्तुत कायदेशीर प्रतिनिधींना देण्यात आलेली नव्हती. परंतु त्यानंतर प्रस्तुत प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी त्यांचे म्हणणे नि.६५ व ६७ वर दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जात नमूद कायदेशीर प्रतिनिधीं व्यतिरिक्त इतर कायदेशीर प्रतिनिधी असल्याबाबत सद्यस्थितीत कोणताही वाद दिसून येत नाही. त्याचप्रमाणे दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्क व हितसंबंध दावा मिळकतीत दिसून येतात. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या मृत्युपश्चात देखील दावा चालविण्याचा हक्क अबाधित राहतो. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाल होणेस मदत होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ अ हे देखील

मयत झाल्याबाबत प्रतिवादींनी नि.१०१ वर पुरसिस दाखल केलेली आहे. सदर पुरसिसीच्या अनुषंगाने वादी यांनी नि.१०२ वर पुरसिस दाखल करुन मयत प्रतापराव सोपानराव जगताप यांचे कायदेशीर प्रतिनिधी आधीच अभिलेखावर असल्यामुळे नव्याने त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना समाविष्ट करण्याची आवश्यकता नसल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ अ यांना वगळून उर्वरित प्रतिवादींना अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

**१.** अर्ज (निशाणी क्र.८८) अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमूद प्रतिवादी क्र.१ बी ते १ एच या कायदेशीर प्रतिनिधींबाबत योग्य ती दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी. तसेच दाव्याची दुरुस्त प्रत सत्वर दाखल करावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.09.29 17:57:13 +0530

ठिकाण — भोर
( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २९.०९.२०२५
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भोर .